प्रेसनोट दिनांक २४/०७/२०२५

जल नि:सारण /मल नि:सारण विभाग, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, या विभागातील, श्री. रविंद्र भिवसन अहिरे, पद – सहायक अभियंता, वर्ग – २ यांचेविरूध्द सापळा कारवाई करून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी घेतले ताब्यात

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ठाणे |
| स्टेशन डायरीनोंद क्र. | महात्मा फुल चौक पोलीस स्टेशन, कल्याण स्टेशन डायरी नोंद क्र. ५६/२०२५ वेळ १७:५५ वा. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. रविंद्र भिवसन अहिरे, वय – ५७ वर्षे, पद – सहायक अभियंता, वर्ग – २, नेमणूक – जल नि:सारण / मल नि:सारण विभाग, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, ता.कल्याण, जि.ठाणे |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ६०,०००/–रूपये |
| तडजोडीअंती स्वीकारलेल्या लाचेची रक्कम | ४०,०००/–रूपये |
| थोडक्यात हकीकत | यातील लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्या श्री समर्थ पेट्रोलींक्स पेट्रोल पंप उघडण्याकरीता लागणारे ड्रेनेज नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी दिनांक १७/०७/२०२५ रोजी संपर्क करून ६०,०००/– रु लाचेच्या रक्कमेची मागणी केलेली होती. अशा आशयाची तक्रार तक्रारदार यांनी दि. १८/०७/२०२५ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो ठाणे येथे दिलेली होती. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १८/०७/२०२५ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक श्री. रविंद्र भिवसन अहिरे, पद – सहायक अभियंता यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती ४०,०००/– रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरून लाप्रवि ठाणे यांनी दिनांक २४/०७/२०२५ रोजी सापळा कारवाईचे आयोजन करून लोकसेवक श्री. रविंद्र भिवसन अहिरे, पद – सहायक अभियंता यांना तक्रारदार यांच्याकडुन बिर्ला कॉलेज गेट बस स्टॉपच्या समोरून खडकपाडा सर्कलकडे जाणाऱ्या रस्त्यावर त्यांचे वापरते वाहनामध्ये ४०,०००/– रुपये लाच स्विकारल्याने रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. |

मार्गदर्शन अधिकारी :– १) श्री शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
२) श्री सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
३) श्री संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

---

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका संबधी काही तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा.

संपर्कपत्ता :–ला.प्र.वि. ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर ठाणे पश्चिम ४००६०१
सकेतस्थळ :– **acbmaharashtra@mahapolice.gov.in**
ई–मेल :– **spacbthane @mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– **acbmaharashtra.net**
टोलफ्रि नंबर :– १०६४
दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉट्स ॲप नं :– ९९३०९९७७००

(अनिल जायकर)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.